# पंचायत समिती गंगाखेड

## बांधकाम विभाग पंचायत समिती गंगाखेड

## ई-निविदा सुचना

पंचायत समिती गंगाखेडच्या वतीने सन 2026-27 या अर्थिक वर्षामध्ये गटविकास अधिकारी, पंचायत समिती गंगाखेड यांचे तर्फे खालील कामांचे जिल्हा परिषदेकडे नोंदणी केलेल्या योग्य त्या कंत्राटदार/जिल्हा परिषद परभणी नोंदणीकृत सुशिक्षीत बेरोजगार अभियंता/जिल्हा परिषद परभणी नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था यांचे कडुन 2 लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या ऑनलाईन पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्रं. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम | निविदा फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| 1 | मौजे ढवळकेवाडी तांडा (ढवळकेवाडी) ता. गंगाखेड येथे सीसी रोड व नाली बांधकाम करणे (वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना 2025-26) | 833861 | 3200 | 6 महीने |

### निविदा भरण्याची कार्यपद्धती

#### 1 - तांत्रिक लिफाफा (Technical Envelope)

1. संपुर्ण निविदा प्रक्रिया ही ई निविदाव्दारे ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी, मार्गदर्शक सुचना, शुद्धीपत्रके इ. ची माहिती www.mahatenders.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
2. वरील कामाचे निविदा प्रपत्रे, अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. सदर संकेतस्थळावर ई-निविदा प्रपत्रे अधिग्रहीत (Download) करणे व ऑनलाईन पद्धतीने सादर करावयाचा कालावधी तसेच निविदा सादर करावयाची अंतिम दिनांक देखील सदर संकेतस्थळावर नमुद केला आहे.
3. कंत्राटदारांनी निविदा 2 लिफाफा (Two Envelope) पद्धतीने सादर करावयाची आहे. तांत्रिक लिफाफा ऑनलाईन पद्धतीने प्रस्तुत कार्यालयात उघडण्याचा कालावधी www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर नमुद केला आहे.
4. शासनाच्या प्रचलित नियमानुसार देयकातुन जीएसटी व इतर आवश्यक कर वसुल करण्यात येतील व याबाबत शासन स्तरावरून होणारे आवश्यक ते बदल निविदा धारकास बंधनकारक राहतील.
5. वरील कामांना काम पुर्ण करण्याचा कालावधी रकाना क्रं. 5 मध्ये दिलेला आहे.
6. कामाची ई निविदा सादर करण्यासाठी प्रपत्रे अधिग्रहीत (Download) करणे तसेच सादर करणे तसेच निविदा उघडणे या बाबत पद्धती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
7. निविदा फी (Tender Fee) व इसार रक्कम (E.M.D.) ऑनलाईन पद्धतीने भरणे बंधनकारक आहे. प्रत्येक कामाचे निविदा फी व इसार रक्कम ही ऑनलाईन E-Payment Gateway पद्धतीनेच भरणे बंधनकारक राहील. पुर्णत: यशस्वी झालेली पेमेंट स्लीप स्कॅन करून तांत्रिक लिफाफ्या सोबत

Scanned with CamScanner

अपलोड करावी. निविदा फी व इसार रकमे बाबत धनाकर्ष किंवा धनादेश स्विकारण्यात येणार नाहीत. मजुर सहकारी संस्थेस इसार रक्कम (E.M.D) भरण्याची आवश्यकता नाही.

8. वस्तु व सेवा कर (G.S.T) व इतर कपाती रकमेचा कामामध्ये समावेश आहे परंतु निविदा रकमेमध्ये यांचा समावेश नसल्याने सदर रक्कम देयका सोबत अदा करण्यात येईल. याबाबत तसेच शासना मार्फत वेळोवेळी होणारे आदेश व बदल कंत्राटदारास बंधनकारक राहतील. या करारा बाबत निविदा धारकास प्रस्तुत कार्यालयाकडे कोणतीही मागणी करता येणार नाही. सर्व निविदा धारकांनी निविदा सादर करताना G.S.T. प्रमाणपत्र स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक राहील.
9. जिल्हा परिषद परभणी कडील नोंदणी केलेले वैध प्रमाणपत्र सोबत स्कॅन करून जोडावे.
10. प्राप्ती कर पॅन कार्ड मुळ प्रत.
11. आवश्यकतेनुसार पुर्ण केलेल्या कामाचे (Work Done Certificate) संबंधित विभागाचे सक्षम प्राधिकारी यांचे स्वाक्षरीचे प्रमाण पत्रा बाबत कागदपत्रे. नवीन नोंद केलेल्या सु. बे. अ. साठी ही अट लागु नाही.
12. आयकर विभाग प्रमाणपत्र (Income Tax Return Verification Acknowledgement).
13. सदर कामासाठी आवश्यकतेनुसार मिक्सर/सेंट्रींगचे साहित्य/व्हायब्रेटर/रोलर/हॉटमिक्स प्लँट/पेवर फिनिशन/मोटार/ट्रक/टिप्पर इत्यादी आवश्यक सामुग्री असल्याबाबत मालकीचे अथवा भाडेतत्वावर घेणार असल्यास ते ज्यांच्याकडुन घेणार आहेत त्या बाबतचे पुराव्याची कागदपत्रे.
14. शासन निर्णय दिनांक 02/12/2016 नुसार रू. 50.00 लक्ष च्या पुढील कामांसाठी तांत्रिक कर्मचारी व त्यांची शैक्षणिक कागदपत्रे.
15. कामावर जे कामगार (Labour) काम करणार आहेत त्यांचे विमा पॉलिसी प्रत असल्यास निविदेसोबत अपलोड करावी.
16. वरील अ. क्रं. 7 ते 15 पर्यंत कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे. कोणतेही कागदपत्रे अपलोड (Upload) केले नसल्यास वा अपुर्ण/अवैध असल्यास सदर ठेकेदाराची निविदा रद्द करण्यात येईल व त्यांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही. कोणतीही कागदपत्रे अपलोड (Upload) करण्यास वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

### 2 - व्यापारी लिफाफा (Financial Envelope)

1. ई निविदे सोबत जोडलेल्या BOQ फाईल मध्ये निविदा धारकाचे नाव व दर नमुद करावा.
2. निविदा प्रक्रिया संपुर्ण संगणकीकृत असल्याने ई प्रणाली व्दारे निविदा उघडल्याचा मेसेज ऑनलाईन येतो. तो पाहण्याची जबाबदारी निविदा धारकांची असुन त्याबाबत स्वतंत्र कोणताही पत्रव्यवहार अथवा भ्रमणध्वनीवर कळविले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.
3. सदर कामाची निविदा मंजुर झाल्यानंतर निधी उपलब्धतेच्या अधीन राहुन देयके पारीत करण्यात येतील. निधी उपलब्ध नसल्यास देयके अदा करण्यात येणार नाही. या बाबत कंत्राटदारास व्याजाची मागणी करता येणार नाही.
4. म.जि.प. व लेखासंहिता 1968 मधील तरतुदीनुसार कामास मुदतवाढ देणे, कामाच्या विलंबा बाबत दंड आकारणे इ. अधिकार सक्षम प्राधिकारी यांचे राहतील.

Scanned with CamScanner

5. निविदे सोबत अपलोड केलेली कागदपत्रे खरी असल्या बाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील य बाबत प्रस्तुत कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

6. निविदा प्रपत्रातील व नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास/निविदाधारकास बंधनकारक राहतील. निविदेतील अटी व शर्ती मध्ये बदल करणे तसेच प्राप्त निविदा धारकांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा/स्थगीत करण्याचा, रद्द करण्यात अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला आहे. निविदा भरणा-या कोणत्याही ठेकेदाराला या संबंधी निविदा फेटाळण्या बद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

7. रस्ते/इमारतीच्या परिसरात आवश्यकतेनुसार कंत्राटदाराच्या स्वखर्चाने झाडे लावण्यात यावीत.

गटविकास अधिकारी श्रेणी-1
पंचायत समिती गंगाखेड

Signature Not Verified
Digitally signed by AKSHAY JEJERAO SUKRE
Date: 2026.05.19 13:43:21 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with CamScanner